नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

दैनिक
# यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - ४ रे Year - 4rd | अंक - ६७ Issue - 67 | वार - शुक्रवार दि. ३१ जुलै २०२६ Blow- Friday Date 31 JULLY 2026 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amount - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

# राज्यसभेतही पेपरफुटीविरोधी विधेयक मंजूर

## दोषींना १० वर्षांपर्यंत तुरुंगवास, ₹१० कोटी दंडाची तरतूद



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

दिल्ली : लोकसभेनंतर राज्यसभेनेही पेपरफुटीविरोधी विधेयक आवाजी मतदानाने मंजूर केले आहे. या विधेयकामुळे परीक्षा प्रक्रियेत गैरप्रकार करणाऱ्यांवर अधिक कठोर कारवाईचा मार्ग मोकळा झाला आहे. विधेयकात पेपरफुटी, संघटित फसवणूक, सायबर हॅकिंग आणि एआयचा वापर करून परीक्षा प्रक्रियेत हस्तक्षेप करणाऱ्यांविरोधात कठोर शिक्षेची तरतूद करण्यात आली आहे.

या विधेयकानुसार, संघटित पद्धतीने पेपरफुटी करणाऱ्या किंवा फसवणुकीचे रॅकेट चालवणाऱ्या आरोपींना कमाल १० वर्षांपर्यंत तुरुंगवासाची शिक्षा होऊ शकते. तसेच दोषींवर १० कोटी रुपयांपर्यंत दंड आकारण्याचीही तरतूद करण्यात आली आहे. पेपरफुटीमुळे फेरपरीक्षा घ्यावी लागल्यास त्याचा संपूर्ण खर्चही दोषींकडून वसूल केला जाईल.

याशिवाय, कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) वापरून परीक्षा प्रक्रियेत फसवणूक करणे, ऑनलाइन प्रश्नपत्रिका प्रसारित करणे, परीक्षा प्रणाली हॅक करणे आणि इतर सायबर गैरप्रकारही या कायद्याच्या कक्षेत आणण्यात आले आहेत. परीक्षा घेणारी संस्था, सेवा प्रदाता, तंत्रज्ञान कंपनी किंवा संबंधित अधिकारी यांचा गैरप्रकारात सहभाग आढळल्यास त्यांच्याविरोधातही कठोर कारवाई करण्यात येणार आहे.

दरम्यान, भाजप नेते तरुण चुघ यांनी या विधेयकाचे स्वागत करत, विद्यार्थ्यांच्या हितासाठी हा महत्त्वाचा निर्णय असल्याचे म्हटले. विद्यार्थ्यांचे भविष्य सुरक्षित ठेवण्यासाठी जलदगती न्यायालये, कठोर शिक्षा आणि मोठ्या दंडाची तरतूद करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले.

या विधेयकामुळे देशभरातील स्पर्धा परीक्षा आणि भरती प्रक्रियेत पारदर्शकता वाढण्यास मदत होईल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# पोलिसांना पॅलेट गन वापरण्याचा अधिकार!

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



नवी दिल्ली: आंदोलनादरम्यान सुरक्षादलांकडून करण्यात येणाऱ्या 'पॅलेट गन' (पालखी किंवा छऱ्यांच्या बंदुकीचा) वापरावरून राजकारण पेटलेले असताना, यासंदर्भात सर्वोच्च न्यायालयाने अत्यंत महत्त्वाची टिप्पणी केली आहे. कायदा आणि सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी असाधारण परिस्थितीत पोलिसांना पॅलेट गन वापरण्याचा अधिकार आहे, असे स्पष्ट करत सर्वोच्च न्यायालयाने मेटल पॅलेट गनच्या वापरावर देशभरात पूर्णपणे बंदी घालण्याची मागणी करणाऱ्या याचिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे.

भारताचे सरन्यायाधीश सूर्यकांत, न्यायमूर्ती जॉयमाल्य बागची आणि न्यायमूर्ती व्ही. मोहना यांच्या विशेष खंडपीठाने या प्रकरणावर सुनावणी घेतली. माजी केंद्रीय माहिती आयुक्त तथा निवृत्त आयपीएस अधिकारी यशोवर्धन आझाद यांच्यासह दोन पीडितांनी सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. जमावाला पांगवण्यासाठी पंप-

**आंदोलनावरील सुनावणीत सर्वोच्च न्यायालयाची महत्त्वाची टिप्पणी**

क्शन अथवा मेटल छऱ्यांच्या (पॅलेट) वापरावर देशभरात पूर्णपणे बंदी घालण्यात यावी, अशी प्रमुख मागणी या याचिकेत करण्यात आली होती. मात्र, न्यायालयाने 'ब्युरो ऑफ पोलीस रिसर्च अँड डेव्हलपमेंट'च्या मार्गदर्शक तत्त्वांचा दाखला देत, गंभीर किंवा असाधारण परिस्थितीत पोलिसांना कायद्यानुसार या शस्त्रांचा वापर करण्याचा अधिकार असल्याचे स्पष्ट केले.

**चौकशीची तयारी**

२० जुलै रोजी झालेल्या आंदोलनादरम्यान पॅलेट गनच्या वापरामुळे जखमी झालेल्या आंदोलक विद्यार्थ्यांना योग्य आणि पूर्णपणे मोफत वैद्यकीय उपचार पुरवण्यात यावेत, असे स्पष्ट निर्देश न्यायालयाने दिल्ली सरकारला दिले आहेत. नीट प्रश्नपत्रिका फुटीविरोधात जंतर-मंतरवर झालेल्या आंदोलनादरम्यान तैनात करण्यात आलेल्या रॅपिड क्शन फोर्सच्या दारूगोळ्याचा संपूर्ण रेकॉर्ड सुरक्षित ठेवण्याचे आदेश न्यायालयाने केंद्र सरकारला दिले आहेत. तसेच सर्वात महत्त्वाची बाब म्हणजे, २० जुलै रोजी झालेल्या आंदोलनातील पॅलेट गनच्या वापराच्या उच्चस्तरीय चौकशीसाठी सर्वोच्च न्यायालयाने तयारी दर्शवली आहे. या प्रकरणातील पुढील सुनावणीत कायदेशीर बाबींवर अधिक सविस्तर निर्णय अपेक्षित आहे.

# राज्यातील रुग्णवाहिकांसाठी आता 'कॅशलेस पेट्रोकार्ड'

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : राज्यातील आरोग्य सेवा अधिक तंत्रस्नेही आणि पारदर्शक करण्यासाठी शासन कटिबद्ध असून, रुग्णवाहिकांसाठी सुरू करण्यात आलेला 'कॅशलेस पेट्रोकार्ड' उपक्रम हा या दिशेने एक महत्त्वपूर्ण टप्पा आहे. या उपक्रमामुळे १०२ रुग्णवाहिका सेवांचे व्यवस्थापन अधिक सक्षम होऊन इंधनाच्या अभावी रुग्णांचे होणारे हाल थांबतील, असा विश्वास सार्वजनिक आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांनी व्यक्त केला.



मुंबईतील आरोग्य सेवा आयुक्तालयात गुरुवारी आयोजित एका कार्यक्रमात 'कॅशलेस पेट्रोकार्ड' उपक्रमाचे उद्घाटन आरोग्यमंत्र्यांच्या हस्ते करण्यात आले. राज्यातील शासकीय वाहनांना वेळेत इंधन उपलब्ध होत नसल्याच्या तक्रारी वारंवार येत होत्या. या पार्श्वभूमीवर आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांच्या संकल्पनेतून आरोग्य सेवेला नवी दिशा देणारा हा अभिनव उपक्रम कार्यान्वित करण्यात आला आहे. या माध्यमातून हिंदुस्थान पेट्रोलियम कॉर्पोरेशन लिमिटेड (एचपीसीएल) यांच्या सहकार्याने राज्यातील ३ हजार १९५ रुग्णवाहिकांना 'कॅशलेस पेट्रोकार्ड' दिले जाणार आहे.

कार्यक्रमाला आरोग्य सेवा आयुक्त संजय काटकर, अतिरिक्त आयुक्त जगन्नाथ विरकर, आरोग्य संचालक डॉ. नितीन अंबाडेकर, सहसंचालक सुनिता गोलाईत, प्रकल्प संचालक (ईएमएस) रवींद्र सावंत, उपसंचालक जयंत मुळे यांच्यासह एचपीसीएल कंपनीचे प्रतिनिधी उपस्थित होते. तसेच दूरदृश्य प्रणालीद्वारे संचालक विजय कंदेवाड, राज्यातील सर्व जिल्हा आरोग्य अधिकारी व जिल्हा शल्यचिकित्सक सहभागी झाले होते.

यावेळी बोलताना प्रकाश आबिटकर म्हणाले की, आरोग्य सेवा ही सर्वसामान्यांसाठी जीवनदायी व्यवस्था आहे. पेट्रोकार्डमुळे रुग्णवाहिकांच्या इंधन खरेदी व्यवस्थापनासह आर्थिक पारदर्शकता येईल, कामकाजातील अनावश्यक विलंब कमी होईल आणि संपूर्ण यंत्रणा अधिक उत्तरदायी बनेल.

१०२ रुग्णवाहिका सेवा सर्व रुग्णांसाठी उपलब्ध - यापूर्वी १०२ क्रमांकाची रुग्णवाहिका सेवा प्रामुख्याने माता व बालकांसाठी वापरली जात होती. मात्र, यापुढे ही सेवा सर्व रुग्णांसाठी मोकळी करण्यात येत आहे. या १०२ रुग्णवाहिका सेवेला अधिक प्रभावी व सक्षम करून १०८ रुग्णवाहिका सेवेला एक मजबूत पर्यायी व्यवस्था म्हणून उभारावे, अशा सूचनाही आरोग्यमंत्र्यांनी दिल्या.

कोरोना काळातील सार्वजनिक आरोग्य यंत्रणेच्या कामगिरीचा उल्लेख करत आरोग्यमंत्र्यांनी अधिकाऱ्यांनी सेवाभावाने काम करण्याचे आवाहन केले. या उपक्रमाच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी त्यांनी आरोग्य आयुक्त, आयटी विभाग व प्रशासकीय अधिकाऱ्यांचे अभिनंदन केले. अत्याधुनिक तंत्रज्ञान आणि प्रभावी मॉनिटरिंगच्या माध्यमातून नागरिकांना अधिक जलद व दर्जेदार आपत्कालीन आरोग्य सेवा देण्यासाठी शासन बांधील असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

# शेतकरी कर्जमाफीसाठी ७ हजार कोटींचा निधी वितरित

मुंबई : 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना २०२६' अंतर्गत पात्र ठरलेल्या राज्यातील शेतकऱ्यांच्या बँक खात्यांत (डीबीटी) लाभाची रक्कम हस्तांतरित करण्यासाठी सहकार विभागाने गुरुवारी तब्बल ७ हजार कोटी रुपयांचा निधी वितरित करण्यास मंजुरी दिली आहे. सहकार विभागाने याबाबतचा शासन निर्णय जारी केला आहे. राज्य मंत्रिमंडळाच्या २ जून २०२६ रोजी झालेल्या बैठकीत या कर्जमुक्ती योजनेला मंजुरी देण्यात आली होती. त्यानंतर योजनेच्या निकषांनुसार १५ जुलै रोजी पूरक पत्राद्वारे अंशतः दुरुस्ती करून पात्र कर्जखात्यांची प्रक्रिया वेगाने पूर्ण करण्यात आली. सहकार आयुक्त कार्यालयाकडून योजनेअंतर्गत पात्र ठरलेल्या शेतकऱ्यांची पहिली यादी प्रसिद्ध झाल्यानंतर, या शेतकऱ्यांना तात्काळ निधी वर्ग करण्यासाठी सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभागाने हा निधी मंजूर केला आहे. चालू आर्थिक वर्षात (२०२६-२७) या कर्जमुक्ती योजनेच्या अंमलबजावणीसाठी राज्य शासनाने नुकत्याच पार पडलेल्या अधिवेशनात पुरवणी मागण्यांद्वारे २० हजार ५५२ कोटी रुपयांची तरतूद केली आहे. यापूर्वी योजनेच्या नियोजन आणि प्राथमिक अंमलबजावणीसाठी सहकार आयुक्त व निबंधक (पुणे) यांना १ कोटी रुपये उपलब्ध करून देण्यात आले होते.

उर्वरित २० हजार ५५१ कोटी रुपयांच्या उपलब्ध निधीपैकी ७ हजार कोटी रुपयांचा पहिला हप्ता आता प्रत्यक्ष वितरणासाठी मोकळा करण्यात आला आहे. या निधीचे वाटप अत्यंत पारदर्शक आणि गतिमान पद्धतीने व्हावे यासाठी सहकार आयुक्त व निबंधक (सहकारी संस्था, पुणे) यांच्या अधीनस्थ असलेल्या सहायक निबंधक (अंदाज व नियोजन) यांना 'नियंत्रण अधिकारी' म्हणून घोषित करण्यात आले आहे. हा निधी लवकरात लवकर आहरित करून पात्र शेतकऱ्यांच्या बँक खात्यांपर्यंत वेळेत पोहोचेल याची दक्षता घेण्याचे आणि खर्चाचा नियमित अहवाल शासनाला सादर करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

**गृहनिर्माण विभागांतर्गत प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) आणि इतर योजनांतर्गत उपलब्ध गृहसाठाबाबत आढावा बैठक**

**मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे प्रतिपादन**

# राज्यातील गृहनिर्माण प्रकल्पांच्या कामांना अधिक वेग द्यावा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : सर्वसामान्यांच्या हक्काच्या घराचे स्वप्न लवकर पूर्ण करण्यासाठी राज्यात विविध गृहनिर्माण प्रकल्प राबविण्यात येत आहे. या सर्व कामांना अधिक गती देऊन प्रकल्प दर्जेदार पद्धतीने तत्परतेने पूर्ण करण्याचे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले.

सह्याद्री अतिथीगृह येथे गृहनिर्माण विभागांतर्गत प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) आणि इतर योजनांतर्गत उपलब्ध गृहसाठा याबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली आढावा बैठक झाली. त्यावेळी त्यांनी यंत्रणांना निर्देश दिले. बैठकीस गृहनिर्माण राज्यमंत्री पंकज भोयर, मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांच्यासह संबंधित यंत्रणांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, गृहनिर्माण प्रकल्पाची अंमलबजावणी अधिक वेगवान करण्यात यावी. जेणेकरून विहित कालावधीत प्रकल्पांचे काम पूर्ण होऊन घरांचे वितरण नागरिकांना करण्यास सुरुवात होईल. कामांचा दर्जा आणि गुणवत्ता याला प्राधान्य देत नियमानुसार प्रकल्प पूर्णत्वास नेण्याची खबरदारी यंत्रणांनी घ्यावी असे निर्देश मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिले.

**नोंदणी मोहिमेला उत्तम प्रतिसाद**

प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) २.० अंतर्गत णथझ वेब पोर्टलवर सुरू असलेल्या लाभार्थी नोंदणी मोहिमेत ३० जुलै २०२६ पर्यंत राज्यात एकूण ४,२१,०८३ लाभार्थ्यांची नोंदणी झाली आहे.

**घटकांचे नियोजन व मंजुरी**

या योजनेअंतर्गत संपूर्ण महाराष्ट्रात एकूण १,६०,४६३ घरकुले मंजूर करण्यात आली असून यात वैयक्तिक घरकुल बांधकाम बीएलसी, भागीदारी तत्वावर परवडणारी घरे (एएचपी), एएचपी-पीपीपी आणि एआरएच भाडेतत्त्वावरील घरे यांचा समावेश आहे. तसेच एसएलएसी मान्यताप्राप्त ४३,६९१ प्रस्तावित घरकुलांचा देखील यात समावेश आहे.

**मोठ्या प्रमाणावर निधी वितरण**

बीएलसी घटकांतर्गत केंद्र व राज्याचा ६७५.४५ कोटींचा निधी मंजूर असून, नुकताच ७ जुलै २०२६ रोजी ४४८.६९ कोटींचा निधी वितरित करण्यात आला आहे; तसेच २४ जुलै २०२६ रोजी दुसऱ्या हप्त्यापोटी ७४.९६ कोटींच्या निधी वितरणाचे आदेश काढण्यात आले आहेत.



**लाभार्थ्यांसाठी भरीव सवलती**

इडब्लूएस घटकातील लाभार्थ्यांना घरकुल बांधकामासाठी ५ ब्रास वाळू मोफत दिली जात असून मोजणी शुल्कात ५०% सूट आणि पहिल्या दस्त्यासाठी केवळ १,०००/- रुपये मुद्रांक शुल्क आकारले जात आहे. तसेच शासकीय व निमशासकीय संस्थांना १/- प्रति चौ.मी. दराने जमीन उपलब्ध करून दिली जात आहे.

**सोलापूरच्या 'रे नगर' प्रकल्पाचा आढावा**

सोलापूर येथील कुंभारी गावात ३६५ एकर जागेवर आकार घेत असलेल्या ३०,००० घरकुलांच्या 'रे नगर फेडरेशन' प्रकल्पाचा आढावाही या बैठकीत घेण्यात आला.

**'गृहनिर्माण साठा' व्यवस्थेचा आढावा**

राज्यातील नागरिकांच्या निवाऱ्याचा प्रश्न अधिक प्रभावीपणे सोडवण्यासाठी आणि विविध प्राधिकरणांकडे उपलब्ध असलेल्या घरांचे योग्य व्यवस्थापन करण्यासाठी 'गृहनिर्माण साठा व्यवस्थापन व महाराष्ट्र निवारा निधी सक्षमीकरण' या महत्त्वाकांक्षी धोरणाचा यावेळी आढावा घेण्यात आला.

म्हाडा, सिडको, एसआरए यांसारख्या विविध प्राधिकरणांकडे सध्या ३५ हजारांहून अधिक घरे उपलब्ध असून, त्यांच्या वितरणासाठी आणि व्यवस्थापनासाठी एकात्मिक यंत्रणा उभी केली जात आहे.

**एकाच पोर्टलवर उपलब्ध होणार घरांची माहिती**

राज्यातील म्हाडा, सिडको, एमएमआरडीए, बीएमसी आणि एसआरए प्राधिकरणांच्या माध्यमातून उपलब्ध होणारी घरे, तसेच केंद्र व राज्य शासनाच्या गृहनिर्माण योजनांमधील रिक्त घरांचे व्यवस्थापन करण्यासाठी सर्व घरांची माहिती एकाच पोर्टलवर संकलित करून 'हाउसिंग स्टॉक' तयार करण्यात येत आहे. याद्वारे दिव्यांग, गिरणी कामगार, माथाडी कामगार, डबेवाले आणि तृतीयपंथीय यांसारख्या विशेष प्रवर्गांसाठी घरे उपलब्ध करून दिली जाणार आहेत.

बैठकीस वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव ओ.पी.गुप्ता, बृहन्मुंबई महानगरपालिका आयुक्त अश्विनी भिडे, नगर विकास विभाग अपर मुख्य सचिव असीम कुमार गुप्ता, अपर मुख्य सचिव के गोविंदराज , एमएम आरडीए महानगर आयुक्त डॉ. संजय मुखर्जी, म्हाडाचे मुख्य कार्यकारी अधिकारी तथा उपाध्यक्ष संजीव जयस्वाल यांच्यासह संबंधित वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

## संपादकीय....

### गृहनिर्माणांना गती

सर्वसामान्यांच्या हक्काच्या घराचे स्वप्न लवकर पूर्ण करण्यासाठी राज्यात विविध गृहनिर्माण प्रकल्प राबविण्यात येत आहे. या सर्व कामांना अधिक गती देऊन प्रकल्प दर्जेदार पद्धतीने तत्परतेने पूर्ण करण्याचे निर्देश नुकतेच मुख्यमंत्र्यांनी दिले. गृहनिर्माण प्रकल्पाची अंमलबजावणी अधिक वेगवान करण्यात यावी. जेणेकरून विहित कालावधीत प्रकल्पांचे काम पूर्ण होऊन घरांचे वितरण नागरिकांना करण्यास सुरुवात होईल. कामांचा दर्जा आणि गुणवत्ता याला प्राधान्य देत नियमानुसार प्रकल्प पूर्णत्वास नेण्याची खबरदारी यंत्रणांनी घ्यावी. नोंदणी मोहिमेला उत्तम प्रतिसाद प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) २.० अंतर्गत णथझ वेब पोर्टलवर सुरू असलेल्या लाभार्थी नोंदणी मोहिमेत ३० जुलै २०२६ पर्यंत राज्यात एकूण ४,२१,०८३ लाभार्थ्यांची नोंदणी झाली आहे. घटकांचे नियोजन व मंजुरी या योजनेअंतर्गत संपूर्ण महाराष्ट्रात एकूण १,६०,४६३ घरकुले मंजूर करण्यात आली असून यात वैयक्तिक घरकुल बांधकाम बीएलसी, भागीदारी तत्वावर परवडणारी घरे (एएचपी), एएचपी-पीपीपी आणि एआरएच भाडेतत्त्वावरील घरे यांचा समावेश आहे. तसेच एसएलएसी मान्यताप्राप्त ४३,६९१ प्रस्तावित घरकुलांचा देखील यात समावेश आहे. मोठ्या प्रमाणावर निधी वितरण बीएलसी घटकांतर्गत केंद्र व राज्याचा ६७५.४५ कोटींचा निधी मंजूर असून, नुकताच ७ जुलै २०२६ रोजी ४४८.६९ कोटींचा निधी वितरित करण्यात आला आहे.

# मुलांच्या आरोग्याचा प्रश्न; सरकारला साथ द्या!

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

**जंक फूडमुक्त शाळा हीच निरोगी भारताची पायाभरणी**

जंक फूड खाऊ नका, सकस आहार घ्या, हा सल्ला आजचा नाही. अनेक वर्षांपासून शिक्षक वर्गात विद्यार्थ्यांना हे सांगत आहेत. पालक घरी मुलांना समजावत आहेत. डॉक्टर, आहारतज्ज्ञ आणि सार्वजनिक आरोग्य क्षेत्रातील तज्ज्ञ सातत्याने संतुलित आहाराचे महत्त्व पटवून देत आ-हेत. तरीही या इशाऱ्यांकडे अनेकांनी गांभीर्याने पाहिले नाही. परिणामी, मुलांमध्ये लठ्ठपणा, पोषणातील असमतोल, दातांचे आजार आणि इतर जीवनशैलीशी संबंधित आरोग्य समस्यांचे प्रमाण वाढताना दिसत आहे. या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांच्या आरोग्याचे संरक्षण करण्यासाठी शासनाला अधिक कठोर नियामक उपाययोजना कराव्या लागत आहेत.

महाराष्ट्र अन्न व औषध प्रशासनाने शाळा, वसतिगृहे आणि कँटीनमधील अन्नसुरक्षेसाठी घेतलेला निर्णय हा केवळ प्रशासकीय आदेश नाही, तर सार्वजनिक आरोग्याच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा उपक्रम आहे. एफएसएसएआय परवाना अनिवार्य करणे, शाळेच्या ५० मीटर परिसरात उच्च साखर, उच्च मीठ आणि उच्च चरबी असलेल्या पदार्थांच्या विक्रीवर निर्बंध आणणे, अन्नाची नियमित तपासणी करणे आणि प्रत्येक शाळेला 'ईट राईट स्कूल' म्हणून विकसित करण्याचा निर्णय समाजाने सकारात्मक दृष्टीने स्वीकारला पाहिजे.

वैद्यकीय संशोधन आणि सार्वजनिक आरोग्य क्षेत्रातील अभ्यास सातत्याने दर्शवितात की बालपण आणि किशोरावस्था हा शरीर, मेंदू, हाडे आणि रोगप्रतिकारशक्तीच्या विकासाचा अत्यंत महत्त्वाचा काळ आहे. या वयात मिळणारा संतुलित आणि पोषक आहार मुलांच्या शारीरिक वाढीबरोबरच स्मरणशक्ती, एकाग्रता, बौद्धिक विकास, भावनिक स्थैर्य आणि शिकण्याच्या क्षमतेवर सकारात्मक परिणाम करतो. याउलट, सतत उच्च साखर, मीठ आणि चरबीयुक्त पदार्थांचे सेवन केल्यास काही मुलांमध्ये लठ्ठपणा, इन्सुलिन प्रतिकार, यकृतातील चरबी, दातांचे विकार आणि इतर आरोग्य समस्या उद्भवण्याचा धोका वाढू शकतो.

शाळांमध्ये विद्यार्थ्यांना ताजी हंगामी फळे, पालेभाज्या, डाळी, कडधान्ये, मोड आलेले धान्य, दूध, ताक, दही, नाचणी, ज्वारी, बाजरी, गहू, भात, शेंगदाणे, हरभरे, तीळ तसेच पोहे, उपमा, इडली, ढोकळा, थालीपीठ यांसारखे पौष्टिक आणि स्थानिक अन्नपदार्थ उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. प्रत्येक शाळेत स्वच्छ पिण्याचे पाणी, स्वच्छ स्वयंपाकघर, सुरक्षित अन्नसाठवण, नियमित अन्न तपासणी आणि पोषणविषयक जनजागृतीची व्यवस्था असली पाहिजे.

त्याचबरोबर चिप्स, कुरकुरे, साखरयुक्त शीतपेये, ऊर्जा पेये, कृत्रिम रंग व स्वाद असलेले पदार्थ, वारंवार तळलेले पदार्थ, अतिप्रक्रिया केलेले खाद्यपदार्थ, साखरयुक्त पॅकेज्ड फळरस आणि जास्त मीठ, साखर व चरबी असलेल्या पदार्थांची विक्री शाळांच्या परिसरात प्रभावीपणे रोखली पाहिजे. हा कोणत्याही व्यापाऱ्याविरोधातील निर्णय नसून विद्यार्थ्यांच्या आरोग्याच्या संरक्षणासाठी आवश्यक असलेला सार्वजनिक आरोग्याचा उपाय आहे.


व्यापारी आणि व्यवसायिक समाजाचाच एक महत्त्वाचा घटक आ-हेत. नफा कमावणे हा व्यवसायाचा स्वाभाविक उद्देश असला, तरी मुलांच्या आरोग्याशी संबंधित बाबींमध्ये सामाजिक जबाबदारीलाही तितकेच महत्त्व दिले पाहिजे. आरोग्यदायी पर्याय उपलब्ध करून देणे हीदेखील एक सकारात्मक व्यावसायिक भूमिका ठरू शकते.

निरोगी आहाराबरोबरच नियमित व्यायाम, मैदानी खेळ, पुरेशी झोप आणि मर्यादित स्क्रीन टाइम हे मुलांच्या निरोगी विकासाचे चार महत्त्वाचे आधारस्तंभ आहेत. केवळ जंक फूडवर निर्बंध घालून अपेक्षित परिणाम मिळणार नाहीत; निरोगी जीवनशैलीची सवयही तितकीच आवश्यक आहे.

या मोहिमेत शिक्षकांनी पोषणशिक्षणाला दैनंदिन शिक्षणाचा भाग बनवावा. पालकांनी मुलांच्या डब्यात घरगुती पौष्टिक पदार्थ द्यावेत. डॉक्टरांनी नियमित आरोग्य तपासणी आणि पोषणविषयक मार्गदर्शन करावे. शाळा व्यवस्थापनाने अन्नसुरक्षेची काटेकोर अंमलबजावणी करावी. स्थानिक स्वराज्य संस्था, स्वयंसेवी संस्था आणि माध्यमांनीही जनजागृतीत सक्रिय सहभाग घ्यावा.

सरकारने नियम केले म्हणजे काम संपत नाही; त्यांची प्रभावी अंमलबजावणी झाली पाहिजे. त्यासाठी समाजाने सरकारला सहकार्य करणे आवश्यक आहे. नियम मोडणाऱ्यांना पाठीशी घालण्याऐवजी विद्यार्थ्यांच्या हिताला प्राधान्य दिले पाहिजे. सरकारला त्यांचे काम करू द्या, प्रशासनाला सहकार्य करा आणि आपल्या मुलांच्या आरोग्यासाठी योग्य निर्णयांना ठाम पाठिंबा द्या.

आजचा योग्य आहार म्हणजे उद्याचा निरोगी भारत. निरोगी विद्या-र्थी म्हणजे सक्षम नागरिक आणि सक्षम नागरिक म्हणजे समर्थ राष्ट्र. मुलांच्या ताटातील अन्न ही केवळ भूक भागविण्याची गोष्ट नाही; ती भारताच्या भवितव्याची गुंतवणूक आहे. शिक्षक, पालक, डॉक्टर, शाळा, व्यापारी, समाज आणि शासन यांनी एकत्रितपणे निरोगी आहाराची संस्कृती निर्माण केली, तरच पुढील पिढी शारीरिक, मानसिक आणि बौद्धिकदृष्ट्या सक्षम घडेल. ही केवळ आरोग्याची मोहीम नाही, तर राष्ट्रनिर्मितीची चळवळ आहे.



**– डॉ. भारत कऱ्हाड, प्राचार्य,**
**वराडकर महाविद्यालय दापोली,**
**जिल्हा रत्नागिरी.**

# सारनाथला जागतिक वारसा दर्जा : बुद्धाच्या धम्मभूमीचा सन्मान, भारताच्या विवेकपरंपरेचा गौरव!

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सारनाथच्या पवित्र भूमीला युनेस्कोच्या जागतिक वारसा स्थळाचा दर्जा मिळाल्याची बातमी ही केवळ एका ऐतिहासिक स्थळाच्या गौरवाची बातमी नाही तर ती भारताच्या बौद्ध, धम्म आणि मानवतावादी परंपरेला जगाने दिलेली मान्यता आहे. ज्या भूमीवर तथागत गौतम बुद्धांनी ज्ञानप्राप्तीनंतर प्रथम धम्मचक्र प्रवर्तन केले, ज्या भूमीतून करुणा, समता, प्रज्ञा आणि अहिंसेचा संदेश जगाच्या दिशेने प्रवासाला निघाला, त्या सारनाथला मिळा-लेला हा सन्मान प्रत्येक भारतीयासाठी अभिमानाचा क्षण आहे. पण हा अभिमान केवळ सोशल मीडियावरील पोस्ट, अभिनंदनाचे संदेश आणि राजकीय श्रेयवादापुरता मर्यादित राहता कामा नये. सारनाथच्या दगडांमध्ये कोरलेला बुद्धाचा विचार आपण आपल्या वर्तमानात किती जिवंत ठेवतो, हा खरा प्रश्न आहे. सारनाथ म्हणजे केवळ पुरातत्त्वीय अवशेष नाहीत. तो भारतीय इतिहासातील एका महान वैचारिक क्रांतीचा साक्षीदार आहे. सिद्धार्थ गौतमांनी बोधगया येथे ज्ञानप्राप्ती केल्यानंतर सारनाथ येथे आपल्या धम्माचा पहिला उपदेश केला. या घटनेला इतिहासात 'धम्मचक्र प्रवर्तन' म्हणून आ-ओळखले जाते. एका व्यक्तीच्या आत्मज्ञाना-चा प्रवास तेथून पुढे संपूर्ण मानवजातीच्या कल्याणाचा मार्ग बनला. बुद्धांनी माणसाला जन्माच्या आधारावर श्रेष्ठ-कनिष्ठ ठरवणाऱ्या व्यवस्थेला आव्हान दिले. कर्मकांडापेक्षा आचरणाला, अंधश्रद्धेपेक्षा प्रज्ञेला, हिंसेपेक्षा करुणेला आणि भेदभावापेक्षा समतेला महत्त्व दिले. म्हणूनच सारनाथचा जागतिक वारसा दर्जा हा बुद्धाच्या भूमीचा सन्मान असला तरी त्याहून मोठे काम आता आपल्या हातात आहे, बुद्धाचा वारसा जपण्याचे!

जगात युद्धे पेटली आहेत. धार्मिक कट्टरता वाढत आहे. माणूस माणसाच्या विरोधात उभा केला जात आहे. द्वेषाची भाषा राजकारणाच्या केंद्रस्थानी येत आहे. सोशल मीडियावर खोट्या माहितीचा आणि अफवांचा पूर आहे. अशावेळी जगाला बुद्धाची गरज आहे. बुद्धांचा धम्म हा कोणत्याही एका जात, धर्म किंवा देशापुरता मर्यादित नाही. तो मानवी दुःख समजून घेण्याचा आणि त्यातून मुक्तीचा मार्ग शोधण्याचा विचार आहे. म्हणूनच सारनाथची ओळख एका प्राचीन वास्तूइतकी मर्यादित ठेवणे म्हणजे त्या भूमीच्या ऐतिहासिक आणि वैचारिक महत्त्वावर अन्याय करणे होय. सारनाथच्या भूमीवरून निघालेला धम्म पुढे भारताच्या सीमा ओलांडून आशिया खंडाच्या अनेक देशांमध्ये पोहोचला. बुद्धाच्या विचारांनी श्रीलंका, म्यानमार, थायलंड, जपान, चीन, कोरिया, तिबेट आणि जगातील अनेक भागांतील समाजजीवनावर प्रभाव टाकला. भारतातून निघालेल्या या प्रज्ञेच्या प्रकाशाने जगाला करुणेचा आणि शांततेचा मार्ग दाखवला. आज जग भारताकडे 'विश्वगुरू' म्हणून पाहण्याची चर्चा करते; पण विश्वगुरू होण्याचा अर्थ केवळ प्राचीन गौरवाच्या कथा सांगण्यात नाही. जगाला जेव्हा द्वेषाऐवजी मैत्री, युद्धाऐवजी शांतता आणि अंधानुकरणाऐवजी विवेकाची गरज आहे, तेव्हा बुद्धाचा मार्ग जगासमोर प्रामाणिकपणे मांडणे हीच खरी विश्वगुरुत्वाची कसोटी आहे.




सारनाथचा हा गौरव भारतीय संविधानाच्या मूल्यांशीही जोडलेला आहे. कारण आधुनिक भारताच्या सामाजिक परिवर्तनाच्या इतिहासात परमपूज्य डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी बुद्धाच्या विचारांना नव्या सामाजिक संदर्भात पुनर्जीवित केले. बुद्धांनी प्रज्ञा, करुणा आणि समतेचा मार्ग दाखवला, बाबासाहेबांनी त्याला स्वातंत्र्य, समता आणि बंधुतेच्या सामाजिक-राजकीय मूल्यांशी जोडले. त्यामुळे सारनाथकडे पाहताना केवळ इतिहासाकडे पाहण्यापेक्षा भारताच्या सामाजिक परिवर्तनाच्या प्रवासाकडे पाहणे आवश्यक आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आयुष्यभर जातिव्यवस्थेच्या अमानवी बंधनांविरुद्ध संघर्ष केला. त्यांनी शिक्षण, संविधान आणि लोकशाहीच्या माध्यमातून वंचित समाजाला सन्मानाने जगण्याचा अधिकार मिळवून दिला. अखेर बुद्धाच्या धम्माचा स्वीकार करून त्यांनी भारतीय समाजाला एक नवा वैचारिक पर्याय दिला. म्हणूनच सारनाथचा सन्मान हा बाबासाहेबांच्या विचारांच्या अनुयायांसाठीही विशेष अर्थपूर्ण आहे. बुद्धाने धम्मचक्र फिरवले आणि बाबासाहेबांनी आधुनिक भारतात सामाजिक समतेचे चक्र गतिमान केले, असे म्हटले तर ते अतिशयोक्ती ठरणार नाही. पण आज आपल्याला स्वतःला विचारावे लागेल. बुद्धाच्या देशात आपण बुद्धाचा विचार किती स्वीकारला आहे?

जर बुद्धाच्या नावाने उत्सव साजरे करायचे आणि त्याच वेळी जातीय भेदभाव कायम ठेवायचा असेल, तर तो बुद्धाचा सन्मान नाही. जर बाबासाहेबांच्या पुतळ्याला हार घालायचा आणि त्यांच्या संविधानिक मूल्यांना मात्र दुर्लक्षित करायचे असेल, तर ती बाबासाहेबांप्रती निष्ठा नाही. जर सारनाथला जागतिक वारसा स्थळाचा दर्जा मिळाल्याचा आनंद व्यक्त करायचा, पण समाजात द्वेष आणि विषमता वाढवायची असेल, तर हा गौरव केवळ देखावा ठरेल. बुद्धाची खरी शिकवण ही माणसाला प्रश्न विचारण्याचे स्वातंत्र्य देते. 'तुम्ही स्वतः विचार करा, तपासा आणि मग स्वीकारा,' हा बुद्धांचा विवेकवादी दृष्टिकोन आजच्या काळात अत्यंत महत्त्वाचा आहे. अंधश्रद्धा, चमत्कार, बुवाबाजी आणि खोट्या प्रचाराच्या काळात बुद्धाची प्रज्ञा आपल्याला वैज्ञानिक दृष्टिकोन शिकवते. आजच्या डिजिटल युगात माहिती क्षणार्धात पसरते; पण प्रत्येक माहिती सत्य असेलच असे नाही. म्हणून बुद्धाची शिकवण म्हणजे केवळ प्राचीन ग्रंथात जतन करण्याची गोष्ट नाही तर ती आजच्या समाजाच्या मानसिक आरोग्यासाठी आणि लोकशाहीच्या भविष्यासाठी आवश्यक असलेली विचारपद्धती आहे.

सारनाथचा जागतिक वारसा दर्जा मिळाल्यानंतर आता केंद्र आणि राज्य सरकारांसमोरही मोठी जबाबदारी आहे. जागतिक वारसा स्थळाचा दर्जा हा केवळ पर्यटन वाढविण्याचा मार्ग म्हणून पाहता कामा नये. पुरातत्त्वीय वारशाचे संवर्धन, पर्यावरणाचे रक्षण, स्थानिक नागरिकांचा सहभाग, ऐतिहासिक स्थळांची शास्त्रीय माहिती आणि पर्यटकांसाठी दर्जेदार सुविधा यांचा समतोल साधला पाहिजे. वारसा स्थळांचे व्यापारीकरण करताना त्यांच्या आत्म्याचा नाश होणार नाही, याची काळजी घेतली पाहिजे. सारनाथला जगभरातून येणाऱ्या पर्यटकांना केवळ प्राचीन वास्तू दाखवून उपयोग नाही. त्यांना बुद्धाचा विचार समजावून सांगणे आवश्यक आहे. धम्मचक्र प्रवर्तनाचा सामाजिक अर्थ, समतेचा संदेश, करुणेचे महत्त्व आणि मानवी स्वातंत्र्याची भूमिका नव्या पिढीपर्यंत पोहोचली पाहिजे. आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून डिजिटल संग्रहालये, बहुभाषिक माहिती केंद्रे आणि विद्यार्थ्यांसाठी अभ्यासक्रम विकसित केले जाऊ शकतात. कारण वारसा जतन करणे म्हणजे केवळ दगड जतन करणे नव्हे, तर त्या दगडांनी सांगितलेला विचार जिवंत ठेवणे होय.

आज सारनाथला मिळालेला जागतिक सन्मान आपल्याला एक ऐतिहासिक संधी देत आहे. बुद्धाचा भारत पुन्हा जगासमोर उभा करण्याची ही वेळ आहे. मात्र त्यासाठी घोषणा नव्हे, तर कृती आवश्यक आहे. आपल्या शाळांमध्ये विवेकवाद वाढला पाहिजे. महाविद्यालयांमध्ये चिकित्सक विचारांना प्रोत्साहन मिळाले पाहिजे. समाजात जातीय आणि धार्मिक द्वेषाला नकार दिला पाहिजे. संविधानातील स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि न्याय ही मूल्ये प्रत्यक्ष जीवनात उतरली पाहिजेत. सारनाथला जागतिक वारसा दर्जा मिळणे हा इतिहासाचा गौरव आहे, पण बुद्धाचा विचार आपल्या वर्तमानात जिवंत ठेवणे ही भविष्याची जबाबदारी आहे. ज्या भूमीवरून बुद्धांनी धम्मचक्र फिरवले, त्या भूमीचा सन्मान जगाने केला आहे. आता आपण त्या धम्मचक्राला आपल्या विचारांत, आचरणात आणि समाजव्यवस्थेत फिरवणार आहोत का? हा प्रश्न प्रत्येक भारतीयाने स्वतःला विचारला पाहिजे.

सारनाथचे दगड बोलतात, द्वेष सोडा, करुणा स्वीकारा. अंधानुकरण सोडा, प्रज्ञेचा मार्ग स्वीकारा. विषमता सोडा, समतेचा मार्ग स्वीकारा आणि बाबासाहेबांचा विचार सांगतो शिका, संघटित व्हा, संघर्ष करा! या दोन्ही संदेशांची सांगड घातली, तरच सारनाथचा जागतिक वारसा दर्जा भारतासाठी खऱ्या अर्थाने ऐतिहासिक ठरेल. अन्यथा तो केवळ एका प्राचीन स्थळाला मिळालेला सन्मान ठरेल. सारनाथला मिळालेला हा सन्मान म्हणजे केवळ भारताच्या इतिहासाचा गौरव नाही तर तो बुद्धाच्या प्रज्ञेचा, धम्माच्या करुणेचा आणि समतेच्या मानवतावादी विचारांचा जागतिक विजय आहे. आता या वारशाचे जतन केवळ दगडांमध्ये नव्हे, तर आपल्या मनात आणि समाजाच्या आचरणात करणे हीच काळाची खरी मागणी आहे!



**– प्रवीण बागडे, नागपूर**
भ्रमणध्वनी: ९९२३६२०९१९
ई-मेल: pravinbagde@gmail.com

## शिवसेनेचा उबाठा जाहीर पाठींबा मागण्याचे निरसन नाही झाल्यास रस्त्यावर उतरणार

# नळदुर्ग नगर परिषदे समोर काँग्रेसच्या नगरसेवकांचे विविध समस्यावर लाक्षणिक उपोषण

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नळदुर्ग/दादासाहेब बनसोडे : नळदुर्ग शहरातल्या विविध प्रश्नावर राष्ट्रीय काँग्रेस पक्षाच्या नगरसेवकांनी एक दिवसाचे उपोषण सुरू केले आहे. यामध्ये नळदुर्ग शहरातील नागरिकांच्या मूलभूत गरजा असतील त्या तात्काळ पूर्ण कराव्यात या गरजा पूर्ण करण्या करित वारंवार पाठपुरावा करून सुद्धा प्रभावी अंमलबजावणी केली जात नाही. नळदुर्ग शहरातील घनकचरा व्यवस्थापन प्रमुख्याने मांडण्याचा मुद्दा म्हणजे घनकचरा व्यवस्थापन आणि घनकचरा निर्मूलनाचे काम निकृष्ट दर्जाचे असल्याने ठेकेदार किंवा कंपनीने रोजंदारी कर्मचारी यांच्यावर रोजंदारी करणाऱ्या कर्मचाऱ्यांना त्यांचा पीएफ त्यांची ऑर्डर त्यांचा युनिफॉर्म व इतर साहित्य देऊन त्यांचा इन्शुरन्स काढावा.

**नगर शहरातल्या विविध प्रश्नावरती महत्त्वपूर्ण लाक्षणिक उपोषण नगरसेवक करत आहेत परंतु उप-ोषण करून सुद्धा जर परिषदेचे पदाधिकारी किंवा प्रशासनाने याकडे दुर्लक्ष केल्यास आम्ही जिल्हाभरात आंदोलन करून रस्त्यावरून उतरून नागरिकांना न्याय देऊ असे प्रतिपादन राष्ट्रीय काँग्रेस पक्षाचे माजी जिल्हाध्यक्ष धीरज भैया पाटील यांनी केले.**

उल्लंघन करणाऱ्या ठेकेदारावर कंपनीवर दंडात्मक कारवाई करून त्या कंपनीला ब्लॅक लिस्टमध्ये टाकावे प्रशासकीय काळामध्ये करण्यात आलेल्या वृक्ष लागवडीचा मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार झाल्याचा संशय आसून या प्रकरणाचे जिल्हाधिकारी यांच्या मार्फत कसुन चौकाशी करण्यात यावी आणि संबधितावर तात्काळ गुन्हे दाखल करावे नगर शहरातील पाणीपुरवठा योजना तातडीने पूर्ण कराव्यात ज्या प्रलंबित कामे आहेत ते कामे प्रलंबित न ठेवता पूर्ण करण्यात यावे. प्रशासकीय काळामध्ये केलेल्या कामाची चौकशी साठी नगरपरिषद सभागृहात ठराव झाल्याप्रमाणे मुख्याधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली चौकशी समिती गठीत वरील चौकशी करण्यात यावी सौर ऊर्जा निर्मिती करणाऱ्या आवाजा कंपनीने नगर परिषदेचे आवश्यक परवानगी न

**नळदुर्ग शहराच्या विविध समस्यावर नगरसेवकांनी लाक्षणिक उपोषण सुरू आहे परंतु कसलाही भेदभाव न करता आम्ही घटनेच्या चौकटीत राहून आहे जे ही कामं उत्कृष्ट झालेले आहेत किंवा प्रलंबित आहेत ते कामे पुर्ण करण्यासाठी आम्ही तत्पर आहोत शिवाय घनकचरा व्यवस्थापन कामात दिरंगाई होत असेल अशा ठेकेदारावर किंवा कंपनीवर चौकशी करून कारवाई करण्यात येईल आम्ही वरील विषयाला अनुसरून एक समिती गठीत करून चौकशी करण्यात येईल आसे प्रतिपादन मुख्याधिकारी रामकृष्ण जाधवर यांनी केले.**

घेता शहरांमध्ये टावर उभारले आहेत. त्यांची चौकशी करून संबंधित कंपनीवर दंडात्मक कारवाई करण्यात यावी. पारस कंपनीने नगर परिषदेत विकास कामे अपुरी ठेवलेले आशा कंपनीला मुदत वाढ न देता कारवाई करावी व त्याना ब्लॅक लिस्ट मध्ये टाकण्यात यावे. नळ योजना कसा पूर्ण करून नागरिकांना जल शुद्धी करून तात्काळ पुरवठा करण्यात यावा.

वरिल समस्यां बाबत कार्यवाही करण्यात येत नसल्यामुळे नळदुर्ग नगर पालिकेतील भारतीय राष्ट्रीय काँग्रेस च्या दहा नगरसेवकांनी नगरपरिषदे समोर एकदिवसीय लाक्षणिक उपोषण सुरू केले आहे.

नळदुर्ग शहरातील नागरिकांच्या मूलभूत नागरी सुविधांबाबत गंभीर समस्या निर्माण झाल्या असून, वारंवार पाठपुरावा करूनही त्यावर प्रभावी कार्यवाही झालेली नाही यासाठीच दहा नगरसेवकाचे लाक्षणिक उपोषण करून पदाधिकारी व प्रशास-नाचे लक्ष वेधण्याचे काम गटनेते मारुती खारवे, आकाश कुलकर्णी, क्रिडा व शिक्षण सभापती इमाम शेख गफूर कुरेशी महिला व बालकल्याण सभापती



अपर्णाताई बेडगे, कमलबाई गायकवाड, मुन्नाभाई कुरेशी जुलेखा बेगम इनामदार, मदिना बागवान, सुधीर पोतदार आदि नगरसेवकांनी केले आहे.

यावेळी नळदुर्ग येथील प्रतिष्ठित नागरिक राष्ट्रीय काँग्रेसचे तुळजा-पूर तालुका अध्यक्ष ड अरविंद बेडगे काँग्रेसचे शहराध्यक्ष अभिजीत कुरेशी शिवसेनेचे उबाठाचे नेते सरदारसिंग ठाकूर, संतोष पुदाले, श्याम कनकधर, रिपाइचे अरुण लोखंडे, पत्रकार विलास येडगे, दादासाहेब बनसोडे, उत्तम बनजगेळे, नळदुर्ग शहर पत्रकार संघाचे अध्यक्ष सुहास येडगे, संदीप महाबोले, दत्तात्रय वाघमारे, रियाज शेख आदिजण उपस्थित होते.


हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# श्री विठ्ठल रूक्मिणी मंदिरास आषाढी यात्रेत ८ कोटी ९२ लाखाचे उत्पन्न

## मंदिरे समितीचे सह अध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांनी दिली माहिती





**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : आषाढी यात्रा कालावधीत वारकरी भाविकांनी श्री विठ्ठल- रुक्मिणी मातेच्या चरणी ८ कोटी ९२ लाख रुपयांचे दान केले तसेच सोन्या चांदीचे दागिने अर्पण केले असून मंदिर समितीला लाडू प्रसाद, देणगी, भक्तनिवास, हुंडीपेटी, श्रींच्या चरणाजवळ आदी विविध देणग्यांच्या माध्यमातून उत्पन्न मिळाल्याची माहिती मंदिरे समितीचे सह अध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांनी दिली.

यंदा आषाढी यात्रा कालावधीत दर्शनरांगेत भाविकांनी मोठ्या प्रमाणात गर्दी केली होती. भाविकांचे सुलभ जलद दर्शन होण्याच्या दृष्टीने आवश्यक त्या उपाययोजना देखील मंदिर समितीने केल्या होत्या. आषाढ शुध्द ०१ (दिनांक १५ जुलै) ते आषाढ शुध्द १५ (दिनांक २९ जुलै) या कालावधीत भाविकांनी श्रींच्या चरणाजवळ ७१४४०७८ रुपये अर्पण, २९३९७०७६ रुपये देणगी, ८३४७००० रुपये लाडू प्रसाद विक्री, ४६३११०३ रुपये भक्तनिवास, २४०३२४०२ रुपये हुंडीपेटी, १५२७४४३ रूपये परिवार देवता तसेच ९६७२९३७ रुपये सोने-चांदी अर्पण, तसेच अगरबत्ती, चंदन खोड, चंदन पावडर, महावस्त्रे, फोटो, मोबाईल लॉकर आदी माध्यमातून ४५२०४३९ इतके उत्पन्न प्राप्त झाले आहे.

मागील वर्षी श्रींच्या चरणाजवळ ७५०५२९१ रुपये अर्पण, २८८३३५६९ रुपये देणगी, ९४०४३४० रुपये लाडू प्रसाद विक्री, ४५४१४५८ रुपये भक्तनिवास, १४४७१३४८ रुपये हुंडीपेटी, ३२४५६८२ रूपये परिवार देवता तसेच ३५९६१७६८ रुपये सोने-चांदी अर्पण, तसेच अगरबत्ती, चंदन खोड, चंदन पावडर, महावस्त्रे, फोटो, मोबाईल लॉकर आदी माध्यमातून १२४५०७५ रुपये व ३ इलेक्ट्रिक रिक्षा /बस चे ३२ लक्ष इतके उत्पन्न प्राप्त झाले होते.

सन २०२५ च्या आषाढी यात्रेत रू. १०८४०८५३१/- व या वर्षीच्या यात्रेत रू. ८९२७२४७८/- इतके उत्पन्न प्राप्त असून, मागील यात्रेच्या तुलनेत रू. १९१३६०५३/- इतकी घट झाल्याचे दिसून येत आहे. या मिळालेल्या दानातून श्री विठ्ठल रूक्मिणी मातेच्या दर्शनासाठी येणाऱ्या वारकरी भाविकांना पुरेसा प्रमाणात सोई सुविधा उपलब्ध करून देण्याचा मंदिर समितीचा प्रयत्न राहील असे व्यवस्थापक प्रविणकुमार घम यांनी सांगितले.

---

# खामसवाडी येथील जगदंबा विद्यालयात गुरुपौर्णिमा मोठ्या उत्साहात साजरी



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

हनुमंत पाटुळे/खामसवाडी प्रतिनिधी : कळंब तालुक्यातील खामसवाडी येथील जगदंबा माध्यमिक विद्यालय येथे आज दि.२९ जुलै २०२६ रोजी गुरुपौर्णिमेनिमित्त गुरुपूजन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमासाठी प्रमुख अतिथी म्हणून श्री. प्रकाश भाऊ जोशी आणि ह.भ.प. आत्माराम सोनवणे महाराज उपस्थित होते.

श्री. प्रकाश भाऊ जोशी व ह.भ.प. आत्माराम सोनवणे महाराज यांच्या संकल्पनेतून पार पडलेल्या या सोहळ्यात विद्यार्थ्यांनी सर्व शिक्षक गुरुजनांचे पूजन करून त्यांच्याप्रती पुष्पगुच्छ देऊन सद्भावना व्यक्त केली.

यावेळी गुरुजनांनी विद्यार्थ्यांना जीवनात शिक्षकांचे महत्त्व पटवून देत कृतज्ञतेचा संदेश दिला. तसेच विद्यार्थ्यांना अभ्यासासोबतच संस्कारक्षम बनण्याचे मार्गदर्शनही केले.

संपूर्ण कार्यक्रम भक्तिभाव आणि उत्साहाच्या वातावरणात पार पडला. शेवटी सर्वांना गुरुपौर्णिमेच्या शुभेच्छा देण्यात आल्या.

कार्यक्रम यशस्वीतेसाठी शाळेचे मुख्याध्यापक, शिक्षक वृंद आणि विद्यार्थ्यांनी विशेष परिश्रम घेतले. या प्रसंगी शाळेतील सर्व शिक्षक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

---

# आ. दिलीपराव बनकर यांना प्रतिष्ठेचा 'निफाड भूषण' पुरस्कार



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : निफाड विधानसभा मतदारसंघाचे आमदार तथा शरदचंद्रजी पवार कृषि उत्पन्न बाजार समिती, पिंपळगाव बसवंतचे सभापती आ. दिलीपराव बनकर यांना सहकार क्षेत्रातील उल्लेखनीय, दूरदृष्टीपूर्ण आणि प्रदीर्घ योगदानाबद्दल यंदाचा प्रतिष्ठेचा 'निफाड भूषण' पुरस्कार जाहीर झाला आहे. सहकारमहर्षी त्र्यंबकराव घुगे गुरुजी भाग्यश्री सहकारी पतसंस्थेचे संस्थापक चेअरमन तथा ज्येष्ठ सहकार नेते रमेशचंद्र घुगे यांनी या पुरस्काराची घोषणा केली आहे.

भाग्यश्री सहकारी पतसंस्थेच्या वर्धापन दिनानिमित्त १ ऑगस्ट रोजी दुपारी २ वाजता निफाड येथील यशोरंग मंगल कार्यालयात आयोजित विशेष समारंभात राजकीय, सामाजिक, शैक्षणिक आणि सहकार क्षेत्रातील मान्यवरांच्या उपस्थितीत आ. बनकर यांना हा मानाचा पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे.

आ. दिलीपराव बनकर यांनी पिंपळगाव बसवंत कृषि उत्पन्न बाजार समितीच्या माध्यमातून केलेल्या विकासकामांमुळे या बाजार समितीला राज्यासह देशभरात स्वतंत्र ओळख मिळाली आहे. अत्याधुनिक सुविधा, शेतकरीहिताचे निर्णय, पारदर्शक प्रशासन, आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर आणि पायाभूत सुविधांचा व्यापक विस्तार यामुळे पिंपळगाव बाजार समिती आज 'हायटेक बाजार समिती' म्हणून ओळखली जाते. शेतकरी, व्यापारी आणि बाजार समितीतील सर्व घटकांना विश्वासात घेऊन त्यांनी विकासाचे नवे मॉडेल उभे केले असल्याचे मानले जाते.

विशेष म्हणजे, सलग २७ वर्षे सभापतीपदाची धुरा यशस्वीपणे सांभाळण्याचा विक्रमही आ. बनकर यांच्या नावावर आहे. सभापतीपदाला केवळ प्रतिष्ठेचे स्थान न ठेवता ते विकासाचे प्रभावी माध्यम बनवत त्यांनी सहकार क्षेत्रात नवे मापदंड निर्माण केले. त्यांच्या नेतृत्वाखाली बाजार समितीने आधुनिकतेकडे वाटचाल करत राज्यातील आदर्श बाजार समिती म्हणून नावलौकिक मिळविला आहे.

पुरस्कार जाहीर करताना ज्येष्ठ सहकार नेते रमेशचंद्र घुगे यांनी सांगितले की, निफाड तालुक्यातील सहकार चळवळीला आधुनिक दिशा, सक्षम नेतृत्व आणि विकासाची नवी दृष्टी देणाऱ्या व्यक्तिमत्त्व म्हणून आ. बनकर यांची निवड करण्यात आली आहे. त्यांच्या कार्यामुळे सहकार क्षेत्रात भावी पिढ्यांसाठी प्रेरणादायी आदर्श निर्माण झाला असून, 'निफाड भूषण' पुरस्कारासाठी ते अत्यंत योग्य मानकरी असल्याचे त्यांनी नमूद केले.

### सहकार क्षेत्रातील प्रदीर्घ योगदानाचा गौरव

दर दोन वर्षांनी प्रदान करण्यात येणारा 'निफाड भूषण' पुरस्कार हा सामाजिक, राजकीय, शैक्षणिक, सहकार, कृषी आणि विविध क्षेत्रांत भरीव योगदान देणाऱ्या मान्यवरांचा सन्मान करणारा प्रतिष्ठेचा पुरस्कार मानला जातो. यापूर्वी स्वर्गीय वनाधिपती विनायकदादा पाटील, माजी मंत्री स्वर्गीय तुकाराम दिघोळे, स्वर्गीय आमदार मालोजीराव मोगल, स्वर्गीय आमदार दुलाजीनाना पाटील, मविप्र संस्थेच्या माजी सरचिटणीस नीलिमाताई पवार, कादवा सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन श्रीराम शेटे तसेच ज्येष्ठ वैद्यकीय तज्ज्ञ डॉ. विजय काकतकर यांसारख्या मान्यवरांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला आहे. त्यामुळे या पुरस्काराला निफाड तालुक्यात विशेष मानाचे स्थान प्राप्त झाले आहे.

आ. दिलीपराव बनकर यांना 'निफाड भूषण' पुरस्कार जाहीर झाल्यानंतर सहकार, राजकीय, सामाजिक, शैक्षणिक तसेच कृषी क्षेत्रातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत असून, यंदाच्या पुरस्कारासाठी योग्य व्यक्तिमत्त्वाची निवड झाल्याची भावना विविध स्तरांतून व्यक्त होत आहे.

---

# नंगपुरामुर्री निवासी शाळेत गुरू-शिष्य स्नेहमिलन साजरा





**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

गोंदिया : शहराला लागून असणाऱ्या नंगपुरामुर्री येथील छत्रपती शिवाजी महाराज पब्लिक स्कूल (अनुसूचित जाती व नवबौद्ध) मुलांची शासकीय निवासी शाळेत गुरुपौर्णिमा हा दिवस गुरू-शिष्य स्नेहमिलन कार्यक्रम साजरा करण्यात आला.

यावेळी मंचावर शाळेचे मुख्याध्यापक रविशंकर इठूले यांच्या अध्यक्षतेखाली प्रमुख पाहुणे म्हणून नीता भलमे, पुष्कराज लांजेवार, साधना पारधी, प्रदीप ढवळे, आशिष शहारे, दीक्षा तुरकर, कार्तिक शहारे, निशा गभणे आदी मान्यवर मंचावर उपस्थित होते.

यात्रसंगी मान्यवरांनी शैक्षणिक क्रांतीचे जनक महात्मा जोतीराव फुले, छत्रपती शाहू महाराज, महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर या महापुरुषांच्या प्रतिमांना माल्यार्पण करून अभिवादन करण्यात आले. तसेच पाहुण्यांचे वर्ग नववीच्या विद्यार्थ्यांनी गुरुंचा सन्मान म्हणून गुलाब पुष्प व एक डायरी सर्वांना भेट देऊन स्वागत व सन्मान करण्यात आला.

### कृतज्ञतापूर्वक कार्यक्रम : गुरुंनी केल्या भावना व्यक्त

यावेळी अध्यक्ष इठूले म्हणाले- विद्यार्थी हा अभ्यासासह कला, कौशल्य व तंत्रज्ञानी बनावे, वडीलधाऱ्या मंडळीचे अपेक्षित कार्य पूर्ण करायला पाहिजे.

शिक्षक लांजेवार म्हणाले- विद्यार्थ्यांनी आईवडील व शिक्षकाविषयी आदर बाळगावा, मान सन्मान करावा तर ही खरी कृतज्ञता राहील.

शिक्षिका भलमे म्हणाल्या- विद्यार्थ्यांनी ज्ञान ग्रहण करून, शिक्षित बनावे, उत्तम कार्य करत रहावे. अशाप्रकारे श्री. ढवळे, श्री. शहारे, श्रीमती पारधी, श्रीमती तुरकर व श्रीमती गभणे यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या. तसेच विद्यार्थी हितेश खंडारे, आयुष शहारे व आरुष नंदेश्वर यांनी आपले मनोगत गुरुवीषयी सांगितले.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक मार्गदर्शन व संचालन मुन्नाभाई नंदागवळी यांनी केले. तर आभार क्रीश जनबंधू या विद्यार्थ्यांने केले. यशस्वीतेसाठी आयोजक सर्व वर्ग नववीमधील विद्यार्थ्यांनी परिश्रम केले.

---

**टोल वसुली सुरू, मात्र रस्त्याची दुरवस्था कायम**

# मुंबई-नाशिक- महामार्गावरील कोशिंबी परिसरात मोठे खड्डे; वाहनधारकांची कसरत



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

ठाणे प्रतिनिधी/मिलिंद जाधव : मुंबई-नाशिक-आग्रा राष्ट्रीय महामार्गावरील कोशिंबी परिसरातील रस्त्याची अवस्था अत्यंत बिकट झाली असून, जागोजागी पडलेल्या मोठमोठ्या खड्ड्यांमुळे वाहनचालकांच्या जीविताला गंभीर धोका निर्माण झाला आहे. विशेषतः दुचाकीस्वारांसाठी हा मार्ग अपघाताचा सापळा ठरत असून, पावसाळ्यात परिस्थिती अधिकच धोकादायक बनली आहे. या पार्श्वभूमीवर महामार्गाची तातडीने दुरुस्ती करून वाहतूक सुरक्षित करावी, अशी जोरदार मागणी स्थानिक नागरिक व वाहनचालकांकडून करण्यात येत आहे. मुंबई, ठाणे, भिवंडी, नाशिक आणि उत्तर महाराष्ट्राला जोडणाऱ्या या राष्ट्रीय महामार्गावरून दररोज हजारो लहान-मोठी वाहने प्रवास करतात. मात्र कोशिंबी परिसरात रस्त्यावर पडलेल्या खोल खड्ड्यांमुळे वाहनचालकांना अक्षरशः जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे. पावसाचे पाणी खड्ड्यांमध्ये साचत असल्याने त्यांची खोली लक्षात येत नाही. परिणामी, वाहनांचा तोल जाऊन अपघात होण्याचा धोका दिवसेंदिवस वाढत आहे.


स्थानिक नागरिकांच्या म्हणण्यानुसार, वाहनचालकांकडून नियमितपणे टोलची वसुली केली जात असली तरी महामार्गाच्या देखभाल आणि दुरुस्तीकडे संबंधित यंत्रणेकडून पुरेसे लक्ष दिले जात नसल्याची भावना व्यक्त होत आहे. त्यामुळे वाहनचालक आणि परिसरातील नागरिकांमध्ये तीव्र नाराजी पसरली आहे. टोल भरूनही सुरक्षित रस्ता मिळत नसेल, तर टोल वसुलीचा नेमका उपयोग काय? असा सवालही नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे. दरम्यान, कोशिंबी येथे उड्डाणपूल उभारण्याची मागणी अनेक वर्षांपासून प्रलंबित आहे. स्थानिकांच्या माहितीनुसार, सुरुवातीच्या आराखड्यात उड्डाणपुलाचा समावेश होता; मात्र नंतर तो वगळण्यात आला. हा निर्णय कोणत्या कारणामुळे घेण्यात आला, याची चौकशी करून उड्डाणपूल तातडीने मंजूर करावा, अशी मागणी स्थानिक नागरिकांनी केली आहे. उड्डाणपूल उभारल्यास वाहतूक कोंडी कमी होण्याबरोबरच अपघातांचे प्रमाणही घटण्यास मदत होईल, असा विश्वास नागरिकांनी व्यक्त केला.

### उड्डाणपुलाच्या मागणीकडेही प्रशासनाचे दुर्लक्ष

महामार्गावरील जीवघेणे खड्डे तात्काळ बुजवून रस्त्याची दुरुस्ती करण्यात यावी, तसेच कोशिंबी उड्डाणपुलाच्या मागणीवर सकारात्मक निर्णय घ्यावा, अन्यथा मोठी दुर्घटना घडल्यानंतरच प्रशासन जागे होणार का, असा संतप्त प्रश्न स्थानिक नागरिकांनी उपस्थित केला आहे. वाहनचालकांच्या सुरक्षेच्या दृष्टीने राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने त्वरित उपाययोजना कराव्यात, अशी सर्व स्तरांतून मागणी होत आहे.

---

# स्वेरीच्या तीन विद्यार्थ्यांची 'जारो एज्युकेशन' या बहुराष्ट्रीय कंपनीत निवड




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर :'जारो एज्युकेशन' या बहुराष्ट्रीय कंपनीने घेतलेल्या निवड प्रक्रियेतून गोपाळपूर (ता. पंढरपूर) येथील स्वेरीज् कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगमधील तीन विद्यार्थ्यांची कॅम्पस ड्राईव्ह मधून निवड करण्यात आली आहे.' अशी माहिती संस्थेचे संस्थापक व कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग (ऑटोनॉमस) चे प्राचार्य डॉ.बी.पी. रोंगे यांनी दिली.

'जारो एज्युकेशन' या बहुराष्ट्रीय कंपनीच्या निवड समितीने निवड प्रक्रियेच्या अंतिम फेरीतून स्वेरीच्या इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन इंजिनिअरिंग या विभागातील अदिती विठ्ठल कुलकर्णी, कॉम्प्यूटर सायन्स अँड इंजिनिअरिंग या विभागातील दत्तात्रय सूर्यकांत आहेरवाडी व सिव्हील इंजिनिअरिंग या विभागातील सृष्टी धनाजीराव लेंडवे या तीन विद्यार्थ्यांची निवड केली असून त्यांना प्रत्येकी वार्षिक रु. ११ लाख इतके पॅकेज मिळाले आहे. अशा नामवंत कंपन्यांमध्ये स्वेरीचे विद्यार्थी दरवर्षी रुजू होत असतात, ही एक विशेष महत्वाची बाब आहे. स्वेरीज् कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग (ऑटोनॉमस) मध्ये विविध राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय कंपन्या प्लेसमेंटसाठी येत असतात आणि कंपनीसाठी पात्र अशा विद्यार्थ्यांची निवड करत असतात. त्यामुळे विविध आंतरराष्ट्रीय कंपन्यांमध्ये येथील विद्यार्थी आपले उत्तम करिअर घडवीत आहेत. या विद्यार्थ्यांना स्वेरीमध्ये विविध प्रकारचे प्रशिक्षण दिले जाते. सदर विद्यार्थ्यांना ट्रेनिंग अँड प्लेसमेंट मधील व त्यांच्या विभागातील प्राध्यापकांचे मार्गदर्शन लाभले.

### मिळाले प्रत्येकी वार्षिक रु. ११ लाखांचे पॅकेज

संस्थेचे संस्थापक व प्राचार्य डॉ.बी. पी. रोंगे, संस्थेचे अध्यक्ष अशोक भोसले, उपाध्यक्ष सुरेश राऊत, सचिव डॉ. सुरज रोंगे, संस्थेचे इतर पदाधिकारी व विश्वस्त, सर्व संचालक मंडळ, स्वेरी अंतर्गत असलेल्या इतर महाविद्यालयांचे प्राचार्य, उपप्राचार्या डॉ. मिनाक्षी पवार, अधिष्ठाता, विभागप्रमुख, प्राध्यापक वर्ग, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी यांच्यासह पालकांनी 'जारो एज्युकेशन' या कंपनीत निवड झालेल्या तिन्ही विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

# श्री स्वामी समर्थ मंदिर कॉरीडॉर निर्मितीला वेग; पहिल्या टप्प्यात ५०० कोटींचा आराखडा सादर करण्याचे मुख्यमंत्र्यांचे आदेश

## धार्मिक पर्यटन आणि परिसराच्या सुशोभीकरणावर विशेष भर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट : श्री स्वामी समर्थांच्या पवित्र नगरीच्या विकासासाठी महत्त्वपूर्ण घडामोड घडली असून, दि. २९ जुलै रोजीच्या शासन निर्णयानंतर अवघ्या २४ तासांत विकास प्रक्रियेला प्रत्यक्ष गती मिळाली आहे. अक्कलकोटचे आमदार सचिन कल्याणशेट्टी यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला यश येत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गुरुवारी (ता. ३०) म्हाडाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांची तातडीची बैठक घेऊन पहिल्या टप्प्यातील ५०० कोटी रुपयांच्या विकास आराखड्याची तयारी करून तो शासनाकडे तातडीने सादर करण्याचे आदेश दिले. या बैठकीला गृहनिर्माण राज्यमंत्री पंकज भोयर, मुख्य सचिव राजेश अग्रवाल, गृहनिर्माण विभागाचे अतिरिक्त सचिव असिमकुमार गुप्ता आणि म्हाडाचे उपाध्यक्ष संजीव जैस्वाल, मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव श्रीकर परदेशी आणि लोकेश चंद्रा,



उपमुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव नवीन सोना तसेच म्हाडाचे इतर अधिकारी सह्याद्री राज्य अतिथी गृह येथे झालेल्या बैठकीस उपस्थित होते.

आमदार कल्याणशेट्टी यांनी अक्कलकोटचा विकास आराखडा विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून म्हाडाकडे सोपविण्याची मागणी केली होती. त्यानुसार अक्कलकोट नगरपरिषद, सोलापूर जिल्हाधिकारी कार्यालय आणि म्हाडा यांनी शासनाकडे प्रस्ताव सादर केला होता. या प्रस्तावास उपमुख्यमंत्री तथा नगरविकास मंत्री एकनाथ शिंदे यांनी मान्यता दिली असून, त्यासंदर्भातील शासन निर्णय दि. २९ जुलै, गुरुपौर्णिमेच्या दिवशी प्रसिद्ध करण्यात आला.

या निर्णयानंतर अवघ्या एकाच दिवसात मुख्यमंत्री फडणवीस यांनी संबंधित अधिकाऱ्यांची बैठक बोलावून विकास आराखड्याबाबत सविस्तर चर्चा केली. बैठकीत श्री स्वामी समर्थ मंदिर परिसर, श्री स्वामी समर्थ समाधी मठ परिसर आणि भाविकांसाठी आवश्यक आधुनिक सुविधा उभारण्याचा सविस्तर आराखडा तयार करून पहिल्या टप्प्यातील ५०० कोटी रुपयांच्या विकासकामांचा प्रस्ताव शासनाकडे सादर करण्याचे निर्देश देण्यात आले.

तसेच, दुसऱ्या टप्प्यात श्री स्वामी समर्थ मंदिर ते श्री स्वामी समर्थ समाधी मठ या पालखी मार्गाचे सुशोभीकरण,




विस्तारीकरण आणि भाविकांसाठी जागतिक दर्जाच्या सुविधा उपलब्ध करून देण्याचा विकास आराखडाही राबविण्यात येणार असल्याची माहिती बैठकीत देण्यात आली.

अक्कलकोटमध्ये दरवर्षी लाखो भाविक दर्शनासाठी येत असल्याने वाढत्या भाविकसंख्येच्या पार्श्वभूमीवर वाहतूक व्यवस्था, पार्किंग, स्वच्छता, पायाभूत सुविधा, धार्मिक पर्यटन आणि परिसराच्या सुशोभीकरणावर विशेष भर देण्यात येणार आहे. विकास आराखडा शासनाकडे मंजुरीसाठी सादर झाल्यानंतर पुढील प्रशासकीय प्रक्रिया वेगाने पूर्ण करून प्रत्यक्ष कामांना प्रारंभ करण्याचे नियोजन करण्यात येणार आहे.

> **महायुती सरकारने अक्कलकोटच्या सर्वांगीण विकासाला सर्वोच्च प्राधान्य दिले आहे. विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून म्हाडाची नियुक्ती झाल्यानंतर अवघ्या एका दिवसात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बैठक घेऊन ५०० कोटी रुपयांचा विकास आराखडा तयार करण्याचे आदेश दिले, ही अक्कलकोटसाठी ऐतिहासिक बाब आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्राताई पवार आणि पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या सकारात्मक भूमिकेमुळे श्री स्वामी समर्थ नगरीचा विकास नव्या उंचीवर पोहोचेल. त्याबद्दल मी सर्वांचे मन:पूर्वक आभार व्यक्त करतो.**
>
> **– सचिन कल्याणशेट्टी**

## परतीच्या प्रवासात पालख्यांना नगराध्यक्ष डॉ. प्रणिता भालके यांची सदिच्छा भेट



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : जातो माघारी पंढरीनाथा तुझे दर्शन झाले आता पुन्हा बोलवावे कृपावंत ही निधावत तुझ्या भेटी!!

या भावपूर्ण अपंगाच्या आ-ळीप्रमाणे आषाढी वारी नंतर परतीच्या प्रवासात मिळालेल्या संतांच्या पवित्र पालखयांना पंढरपूर नगरपरिषदेच्या नगराध्यक्ष डॉक्टर सौ प्रणिता ताई भगीरथ भालके यांनी सदिच्छा भेट देत श्रीचे दर्शन घेतले

यावेळी वारकरी बांधवांशी संवाद साधून त्यांच्या सुखरूप व मंगलमय परतीच्या प्रवासासाठी शुभेच्छा दिल्या संतांची भक्ती जनता सेवा आणि मानवतेचा संदेश समाजात अखंड तेवत राहो हीच विठ्ठल चरणी प्रार्थना व्यक्त केली.

यावेळी उपस्थित नगरसेवक ओंकार जोशी, संजय बंदपट्टे, सुधीर धोत्रे, माजी नगरसेवक किरण घाडगे, व त्यांच्यावरून सामाजिक कार्यकर्ते ही उपस्थित होते.

## अभिनेत्री अभिज्ञा बर्वे यांनी कुटुंबासमवेत घेतले श्री स्वामी समर्थांचे दर्शन



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट : मराठी चित्रपट आणि मालिकांमधील लोकप्रिय अभिनेत्री अभिज्ञा बर्वे यांनी कुटुंबासह आज श्री वटवृक्ष स्वामी महाराज मंदिरात येऊन श्री स्वामी समर्थ महाराजांचे मनोभावे दर्शन घेतले.

यावेळी मंदिर समितीच्या वतीने समितीचे चेअरमन तथा नगरसेवक महेश इंगळे यांच्या मार्गदर्शनानुसार श्रीशैल गवंडी यांनी अभिनेत्री अभिज्ञा बर्वे व कुटूंबियांचा स्वामींचे कृपावस्त्र, प्रसाद देऊन यथोचित सत्कार केला. यावेळी बोलताना अभिज्ञा बर्वे म्हणाल्या की, स्वामींच्या दरबारात पाऊल टाकताच मनाला अपार शांती मिळते. वटवृक्ष मंदिरातील वातावरण खूप पवित्र आणि ऊर्जा देणारे आहे. इथे होणारी स्वामी भक्ती व सेवा ही खरोखरच अनुकरणीय आहे. हजारो भक्तांना रोज स्वामी दर्शनाचा मोफत लाभ मिळतो ही खुप मोठी सेवा आहे. मंदिर व्यवस्थापनाचे आणि चेअरमन महेश इंगळे यांचे मना-पासून आभार. स्वामींचा आशीर्वाद सर्वांवर राहो अशीच प्रार्थना असल्याचे मनोगत व्यक्त केले. यावेळी दर्शनासाठी आलेल्या इतर भक्तांनीही अभिनेत्रीला पाहून आनंद व्यक्त केला. यावेळी मंदिर समितीचे विश्वस्त महेश गोगी, श्रीशैल गवंडी, अविनाश क्षीरसागर, प्रसाद सोनार, संजय पवार, विपुल जाधव, सागर गोंडाळ आदिसह भाविक भक्त उपस्थित होते.

> **मंदिर समितीकडून श्रीशैल गवंडी यांच्या हस्ते स्वामी कृपावस्त्र, प्रसाद देऊन अभिनेत्री अभिज्ञा बर्वे यांचा सत्कार**

## डॉक्टर श्रद्धा कदम यांनी आषाढी वारी ३००० रुगणावर केले मोफत उपचार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : पंढरपूर येथील आषाढी यात्रेनिमित्त श्री विषनधरा आयुर्वेदिक प्रतिष्ठांच्या वतीने डॉक्टर श्रद्धा कदम यांच्या मार्गदर्शनाखाली सोबत आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते व या सोबत आरोग्य शिबिरामध्ये ३००० वारकऱ्यांवर मोफत उपचार करण्यात आले. श्री विश्वधारा आयुर्वेदिक प्रतिष्ठानच्या वतीने सलग चार वर्षापासून आषाढी वारीमध्ये मोफत आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात येत आहे.

श्री विश्वधारा आयुर्वेदिक प्रतिष्ठांच्या वतीने आषाढी वारी मधील येणाऱ्या आरोग्य शिबिरामध्ये डॉक्टर श्रद्धा कदम डॉक्टर श्रीकांत, खटावकर, श्रीकांत नरळे डॉक्टर किरण थोरात डॉक्टर, स्वप्निल बारी निलेश जगताप दिपाली सतपाल सारिका खाटीकर्पा व पूजा मॅडम यांनी परिश्रम घेतले व या शिबिरासाठी रेखा चंद्राव यांनी सहकार्य केले व आषाढी यात्रेमध्ये प्रचंड प्रमाणे मध्ये वारकरी पंढरपूर येथे दाखल झाले होते त्याप्रमाणे त्याप्रमाणे पावसाचाही परिणाम झाल्यामुळे वारकऱ्यांना थंडी ताप अंगदुखी डोकेदुखी मळमळने अशा अनेक आजारा होते व या तरी वारकरी रुग्णावर श्री विश्वधारा आयुर्वेदिक प्रतिष्ठानच्या वतीने मोफत उपचार करण्यात आले व श्री विश्वधारा आयुर्वेदिक प्रतिष्ठानच्या या चिकित्सक उपाधीक्षक हिम्मत जाधव उपविभागी पोलिसातील विक्रम कदम यांनी भेट दिली

## अभिनयातून समाजप्रबोधन करणाऱ्या महेश्वर तेटांबे यांचा 'महाराष्ट्र समाजभूषण' पुरस्काराने सन्मान

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई/केतन भोज ; आपल्या दर्जेदार अभिनयातून समाजप्रबोधनाचा वारसा जपणारे प्रसिद्ध सिने-नाट्य अभिनेते, लेखक आणि दिग्दर्शक महेश्वर भिकाजी तेटांबे यांना नुकताच शिर्के जनकल्याण प्रतिष्ठानतर्फे अत्यंत मानाचा 'महाराष्ट्र समाजभूषण पुरस्कार २०२६' देऊन गौरविण्यात आले. मुंबई मराठी ग्रंथालयाच्या सुरेंद्र गावस्कर सभागृहात पार पडलेल्या या भव्य सोहळ्यात, प्रसिद्ध बॉलिवूड अभिनेते गणेश यादव आणि मुंबईचे माजी नगरपाल डॉ. जगन्नाथराव हेगडे यांच्या शुभहस्ते तेटांबे यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. लालबाग-परेलसारख्या कामगार वस्तीतील जनसामान्यांच्या ज्वलंत समस्यांवर आपल्या प्रखर लेखणीने आणि अभिनयाने वाचा फोडणारे व्यक्तिमत्त्व म्हणून महेश्वर तेटांबे यांची ओळख आहे. एकांकिका, नाटके, मालिका, लघुपट, वेबसिरीज आणि चित्रपट अशा विविध माध्यमांतून अभिनय व दिग्दर्शनाची धुरा सांभाळत त्यांनी आ-पली कला जपली आहे. विशेष म्हणजे, आ-पली खाजगी नोकरी पूर्ण निष्ठेने सांभाळत त्यांनी सामाजिक संस्थांच्या माध्यमातून निरपेक्ष वृत्तीने समाजोपयोगी सेवाभावी कार्य अविरत सुरू ठेवले आहे. कला आणि सामाजिक क्षेत्रातील या दैदिप्यमान योगदानाची दखल घेत यापू-र्वीही त्यांना 'जागृत नागरिक', 'जागृत पत्रकार', 'आदर्श नागरिक', 'कलारत्न' आणि 'समाजमित्र' अशा ३२० हून अनेक प्रतिष्ठित पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले आहे. आता त्यांच्या या प्रेरणादायी प्रवासात 'महाराष्ट्र समाजभूषण पुरस्कारा'ची सुवर्णमोहर उमटल्याने सर्वस्तरातून आणि कला-सामाजिक वर्तुळातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. या सोहळ्यास ज्येष्ठ संपादक व राजकीय विश्-लेषक डॉ. सुकृत खांडेकर, विधानमंडळाचे माजी प्रधान सचिव डॉ. अनंत कळसे आणि शिर्के जनकल्याण प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष सुनील भार्गवराम शिर्के यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.




## निफाड तालुक्यातील भारनियमन अखेर बंद



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : गत काही दिवसा पासून निफाड शहरासह परिसरात रात्री तीन ते चार तास सुरू असलेल्या भारनियमनाने शेतकरी वर्ग व विद्यार्थी आणि सर्वसामान्य नागरिक मोठ्या प्रमाणात त्रस्त झाले होते. या समस्येबाबत भाजपाचे निफाड तालुका माजी सरचिटणीस सचिन धारराव यांनी जिल्हाध्यक्ष यतीन कदम यांचे मार्गदर्शनाखाली ओझर येथे नामदार गिरीश महाजन यांची भेट घेऊन तालुक्यातील नागरिकांच्या या समस्ये कडे लक्ष वेधले होते.

यावेळी महाजन यांनी तातडीने संबंधित महावितरण कंपनीच्या अधिकाऱ्यांशी संपर्क साधून भारनियम बंद करण्याचे आश्वासन दिले. महाजन यांचे आदेशामुळे भारनियमान बंद झाल्याने नागरिकांनी समाधान व्यक्त केले. याबाबत सचिन धारराव यांनी पाठपुरावा करत हा प्रश्न तडीस नेल्याबद्दल अभिनंदन होत आहे.


याप्रसंगी माजी जिल्हाध्यक्ष शंकरराव वाघ, केशवराव सुरवाडे, गौरव व्यवहारे,भारतीय जनता पार्टीचे अनेक पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उप-स्थित होते.

**१ ऑगस्ट 'लेखन प्रेरणा दिन' उत्साहात साजरा करा; शासन निर्णयाची प्रभावी अंमलबजावणी करा**

## साहित्यरत्न लोकशाहीर डॉ.अण्णाभाऊ साठे यांच्या विचाराचा प्रसार व्हावा : भाई बजरंग ताटे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कळंब/प्रतिनिधी : साहित्यरत्न लोकशाहीर डॉ. अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त महाराष्ट्र शास-नाने१ ऑगस्ट हा दिवस 'लेखन प्रेरणा दिन' म्हणून साजरा करण्याचे आद-ेश दिले आहेत. याबाबतचे परिपत्रक उच्च व तंत्र शिक्षण विभागाने २९ जुलै २०२६ रोजी जारी केले असून शासनाच्या सूचनेनुसार राज्यातील सर्व विद्यापीठे, महाविद्यालये आणि उच्च व तंत्र शिक्षण संस्थांमध्ये विद्यार्थ्यांमध्ये वाचन-लेखन आणि साहित्याची अभिरुची वाढवण्यासाठी विविध साहित्यिक व सांस्कृतिक उपक्रमांचे आयोजन करावे लागणार आहे. तसेच या परिपत्रकानुसार संस्थांमध्ये वक्तृत्व स्पर्धा, वाद-विवाद स्पर्धा, निबंध



लेखन, कविता लेखन, व्याख्याने, चर्चासत्रे, परिसंवाद, कार्यशाळा आणि साहित्य संमेलन घेण्यात यावे. याशिवाय स्थानिक साहित्यिकांच्या मुलाखती तसेच त्यांच्या व्याख्यानांचे आयोजन करण्यावर भर देण्यात आला आहे. साहित्यरत्न लोकशाहीर डॉ. अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्याची ओळख विद्यार्थ्यांना व्हावी यासाठी त्यांच्या कथा, कादंबऱ्या, प्रवासवर्णने, लोकनाट्य आणि शाहीरी साहित्याचे सामूहिक वाचन आयोजित करण्याच्या सूचनाही देण्यात आल्या आहेत. त्यांच्या व्यक्तिमत्व आणि साहित्य कर्तृत्वावर विशेष व्याख्यान घेऊन सामाजिक परिवर्तनातील त्यांच्या योगदानाची माहिती विद्यार्थ्यांपर्यंत पो-होचवावी, असेही परिपत्रकात म्हटले आहे.

वाचन संस्कृती रुजवण्यासाठी ग्रंथदिंडी काढण्याचे निर्देशही देण्यात आले आहेत. साहित्यरत्न लोकशाहीर डॉ.अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्यावर चर्चासत्र, परिसंवाद आणि कार्यशाळांच्या माध्यमातून विद्यार्थी, संशोधक आणि नवोदित लेखकांना लेखनासाठी प्रेरित करणे हा शासनाचा उद्देश असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

या निर्णयाचे स्वागत करताना मानवी हक्क अभियानचे संस्थापक सदस्य तथा श्रमिक मानवाधिकार संघाचे पदाधिकारी भाई बजरंग ताटे म्हणाले की, विद्यार्थ्यांमध्ये लेखन, वाचन आणि साहित्याची आवड निर्माण करण्यासाठी शासनाचा हा निर्णय अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. हा निर्णय केवळ कागदावर न राहता प्रत्येक संस्थेत काटेकोरपणे राबवला जावा अशी अपेक्षा व्यक्त केली. तर श्रमिक मानवाधिकार संघाच्या जिल्हाध्यक्षा माया शिंदे म्हणाल्या की, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांचे साहित्य हे सामाजिक परिवर्तन, समता, बंधुता आणि मानवतेचा संदेश देणारे आहे. शासनाने जारी केलेल्या परिपत्रकानुसार प्रत्येक शैक्षणिक संस्थेत 'लेखन प्रेरणा दिन' विविध साहित्यिक उपक्रमांद्वारे उत्साहात साजरा करण्यात यावा असे मत व्यक्त केले.

साहित्य रत्न लोकशाहीर डॉ. अण्णाभाऊ साठे यांच्या विचारांचा, साहित्याचा आणि सामाजिक कार्याचा व्यापक प्रसार व्हावा यासाठी महाराष्ट्र प्रशासनाकडे विशेष मागणी

मानवी हक्क अभियान चे संस्थापक सदस्य तथा श्रमिक मानवाधिकार संघाचे भाई बजरंग ताटे आणि जिल्हाध्यक्षा माया शिंदे यांनी केली असल्याचे प्रसिद्धी पत्रकाद्वारे कळविले आहे.